म. ग्रं. सं. ठाणें

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक

पुस्तकाचें नांव

# मुंबई इलाख

# भूगोल पत्रक

## (भू प्रवास)

# मुंबई इलाख्याचें भूगोलपत्रक.

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणें.

## दिशा.

एकंदर दिशा आठ आहेतः—

ज्या दिशेस सूर्य उगवतो, ती **पूर्व** दिशा.

ज्या दिशेस सूर्य मावळतो, ती **पश्चिम** दिशा.

पूर्वेकडे तोंड करून उभें राहिलें, ह्मणजे उजव्या हाताकडे **दक्षिण** दिशा, आणि डाव्या हाताकडे **उत्तर** दिशा.

पूर्व आणि दक्षिण ह्यांच्या मधला कोपरा ती **आग्नेयी** दिशा.

दक्षिण आणि पश्चिम यांच्या मधला कोपरा ती **नैर्ऋत्य** दिशा.

पश्चिम आणि उत्तर ह्यांच्या मधला कोपरा ती **वायव्य** दिशा

उत्तर आणि पूर्व ह्यांच्या मधला कोपरा ती **ईशान्य** दिशा

---

## नकाशावरील दिशा.

नकाशासमोर उभें राहिलें तर नकाशाची वरची बाजू ती उत्तर दिशा.

खालची बाजू ती दक्षिण दिशा.

उजव्या हाताकडची बाजू ती पूर्व दिशा.
डाव्या हाताकडची बाजू ती पश्चिम दिशा.

---

## भूगोलाच्या व्याख्या.

पृथ्वीचा आकार वाटोळा आहे, परंतु दक्षिणेकडे व उत्तरेकडे किंचित् चापट आहे.

पृथ्वी वाटोळी आहे ह्याला तीन प्रमाणें आहेत:—

१. पृथ्वीची सांवली चंद्रावर पडली, ह्मणजे त्यालाच चंद्रग्रहण ह्मणतात. ती सांवली वाटोळी असते.
२. उत्तरेकडे जसें जसें जावें, तसें तसें ध्रुव नक्षत्र डोक्याकडे उंच होत जातें.
३. गलबतांत बसून गलबताचें तोंड फिरविल्यावांचून पृथ्वीला प्रदक्षिणा करून पहिल्या ठिकाणीं येतां येतें.

पृथ्वीचे जमीन आणि पाणी असे दोन भाग आहेत एक हिस्सा जमीन आणि तीन हिस्से पाणी आहे.

जमिनीचे नऊ विभाग आहेत:—

१. पृथ्वीचा जो जमिनीचा मोठा भाग असतो, त्याला **महाद्वीप** ह्मणावें.
२. चोहींकडून पाण्यानें वेढलेल्या जमिनीस **बेट** ह्मणावें.
३. तीन बाजूंकडून पाणी आणि एका बाजूनें जमिनीला लागलेली, अशा जमिनीस **द्वीपकल्प** ह्मणावें.

४ जमिनीचा जो फांटा समुद्रांत गेलेला असतो, त्याला **भूशिर** ह्मणावें.

५ दोन जमिनींस जोडणारी जी अरुंद जमीन तिला **संयोगभूमि** म्हणावें.

६ समुद्राच्या कांठच्या जमिनीस **किनारा** म्हणावें.

७ ज्या गांवाजवळ गलबतें किनाऱ्यास लागण्याची सोय असते, त्या गांवास **बंदर** म्हणावें.

८ जमिनीवरील उंचवट्याला **टेंकडी** म्हणावें; मोठा उंचवटा असल्यास त्याला **डोंगर** म्हणावें; फार मोठा व लांब गेलेला उंचवटा असल्यास त्याला **पर्वत** म्हणावें.

९ सपाट जमिनीला **मैदान** म्हणावें.

पाण्याचे भाग नऊ आहेत:—

१ पृथ्वीवर खाऱ्या पाण्याचा जो मोठा सांठा आ[illegible] त्याला **महासागर** म्हणावें.

२ जमिनीच्या जवळचा जो महासागराचा भाग, त्य[illegible] **समुद्र** म्हणावें.

३ समुद्राचा फांटा जमिनीवर गेला असतो, त्या फ[illegible] ला **आखात** म्हणावें.

४ मोठें रुंद आखात असलें म्हणजे त्याला [illegible] म्हणावें.

५ दोन समुद्रांला जोडणारा जो पाण्याचा भाग, त्याला **सामुद्रधुनी** ह्मणावें.

६ चोहोंकडून जमिनीनें वेढलेला जो पाण्याचा भाग, त्याला **सरोवर** ह्मणावें.

७ डोंगरापासून, पर्वतापासून, अथवा सरोवरापासून जो पाण्याचा मोठा पाट वाहूं लागतो,त्याला **नदी** ह्मणावें. जेथून नदी निघते त्या ठिकाणाला **नदीचा उगम** ह्मणावें. जेथें ती दुसऱ्या नदीला, सरोवराला, अथवा समुद्राला मिळते,त्या ठिकाणाला **नदीचें मुख** ह्मणावें. ज्या प्रदेशावरून नदी वाहते, त्या प्रदेशाला **नदीचें पात्र** ह्मणावें.

८ नदीच्या पात्रांतून जें समुद्राच्या भरतीचें पाणी दूर जातें त्याला **खाडी** ह्मणावें.

९ व्यापाराच्या व शेतकीच्या सोईसाठीं जो नदीचा फांटा काढून नेला असतो, त्या फांट्याला **कालवा** ह्मणावें. समुद्राचें पाणी चढतें त्याला **भरती**, आणि उतरतें त्याला **ओहोटी** ह्मणावें.

# मुंबई इलाख्याचें सामान्य वर्णन.

हिंदुस्थान देशाच्या पश्चिमेकडील अरुंद पट्टीला मुंबई इलाखा असें ह्मणतात.

## मर्यादा.

वायव्येस—बलूचिस्थान.

ईशान्येस—राजपुतान्यांतील संस्थानें.

उत्तरेस—पंजाब.

पूर्वेस—मध्य हिंदुस्थानांतील संस्थानें, मध्यप्रांत ( सेंट्रलप्राव्हिन्सेस ), वऱ्हाड आणि निजामाचें राज्य.

दक्षिणेस—मद्रास इलाखा आणि म्हैसूर.

पश्चिमेस—अरबी समुद्र

---

## पर्वत.

१ सह्याद्रि पर्वत.—हा तापी नदीच्या मुखापासून दक्षिणेकडे गेला आहे.

२ सातपुडा पर्वत.—हा नर्मदा आणि तापी ह्या नद्यांमधून पश्चिमेकडून पूर्वेस गेला आहे.

---

## घाट.

डोंगरावरून अथवा पर्वतावरून जाणाऱ्या ज्या वाटा असतात, त्यांस घाट असें ह्मणतात.

सह्याद्रि पर्वतांत पुष्कळ घाट आहेत, त्यांपैकीं कांहीं सांगतों.

थळघाट.—नाशिकाजवळ.

बोरघाट.—खंडाळ्याजवळ.

पारघाट.—महाबळेश्वराजवळ.
माळशिरसचा घाट.—जुन्नराजवळ.
वरंध्या घाट.—महाडचे रस्त्यावर.
कुंभारली घाट.—चिपळूणाजवळ.
आंबे घाट.—कोल्हापुराहून रत्नागिरीचे रस्त्यावर.
आंबोलीघाट.—बेळगांवाहून वेंगुर्ल्याचे रस्त्यावर.
किन्हईघाट.—बेळगांवाहून गोंव्याचे रस्त्यावर.
आबैलघाट.—धारवाडाहून कारवारचे रस्त्यावर.
देविमणीघाट.—शिर्सीहून कुमठ्याचे रस्त्यावर.
मलिमणी घाट,—सिद्धापुराहून गेरसाप्पाच्या रस्त्यावर.
आंबवलाघाट.—खेड्याजवळ.
फोंडा, अणस्कुरा, व बावडा.—हे घाट कोल्हापुराजवळ.
रामघाट—दक्षिण महाराष्ट्र देशांत.

---

## डोंगर.

कळसूबाईचा.—थळघाटाजवळ. उंची ५२५० फूट.
चांदवडचे डोंगर—नाशिक जिल्ह्यांत.
अजिंठ्याचे डोंगर—खानदेशाचे दक्षिणेस.
शंभुमहादेवाचा डोंगर—सातान्याजवळ.
जोतिबाचा डोंगर—कोल्हापुराजवळ.
अहमदनगरचे डोंगर—अहमदनगरच्या उत्तरेस.

## नद्या.

**सिंधुनद**—तिबेट देशांत मानस सरोवराजवळ उगम पावून सिंध देशांतून वहात जाऊन आरबी समुद्रास मिळते. हिच्या कांठीं सक्कर, रोरी, हैदराबाद,आणि कराची हीं शहरें आहेत.

**साबरमती**—राजपुतान्यांत उगम पावून गुजराथेंतून वाहत जाऊन खंबायतच्या अखातास मिळते. हिच्या कांठीं अहमदाबाद शहर आहे.

**मही**.—माळव्यांत उगम पावून गुजराथेंतून वाहत जाऊन खंबायतच्या अखातास मिळते. हिच्या कांठीं खंबायत शहर आहे.

**नर्मदा**.—मध्यप्रांतांत अमरकंटक पर्वतांत उगम पावून गुजराथेंतून वहात जाऊन खंबायतच्या अखातास मिळते. हिच्या कांठीं भडोच शहर आहे.

**तापी**.—सातपुड्यांत बैतुल गांवाजवळ उगम पावून खंबायतच्या अखातास मिळते. हिच्या कांठीं सुरत शहर आहे.

**गोदावरी**.—नाशिकाजवळ त्रिंबकेश्वराच्या डोंगरांत उगम पावून पूर्वेस निजामाचे राज्यांतून वाहत जाऊन बंगालचे उपसागरास मिळते. हिच्या कांठीं नासिक, त्रिंबक. कोपरगांव, पुणतांबें, टोकें गंगाखेड, व पैठण हीं शहरें आहेत. हिला वाई

नगंगा, पैनगंगा, वर्धा, प्रवरा, आणि मांजरा ह्या नद्या मिळतात.

कृष्णा.—महाबळेश्वराच्या डोंगरांत उगम पावून पूर्वेस वाहत जाऊन बंगालच्या उपसागरास मिळते. हिच्या कांठीं माहुली, वाई, कऱ्हाड, सांगली, नरसोबाची वाडी, हीं आहेत. हिला घटप्रभा, मलप्रभा. वेण्या, कोयना, भीमा, वार्णा, तुंगभद्रा, ह्या नद्या मिळतात.

भीमा.—भीमाशंकराच्या डोंगरांत उगम पावून कृष्णेस मिळते. हिचे कांठीं पंढरपूर, कोरेगांव, दौंड, व नरसिंगपूर हीं आहेत. हिला सीना, घोडनदी, निरा, व मुळा-मुठा ह्या नद्या मिळतात.

वर्धा आणि शेरावती—ह्या नद्या उत्तर कानड्यांत आहेत.

---

## अखातें.

कच्छचें आणि खंबायतचें अशीं दोन अखातें आहेत.

## खाड्या.

वसईची, बाणकोटची, जयगडची, जैतापूरची, दाभिळ्याची.

## सरोवरें.

मंचर सिंध प्रांतांत, धावर गुजराथेंत, व विहार मुंबईजवळ

## कालवे.

१ सक्कर जवळ, २ रोरीपासून खैरपुराकडे गेला आहे, ३ कृष्णा नदीचा कऱ्हाडापासून मिरजेपर्यंत नेला आहे, आणि ४ गोकाक शहराजवळ घटप्रभा नदीस दोन कालवे काढिले आहेत.

## भूशिरें.

मौझ सिंध प्रांतांत, जगत आणि दीव गुजराथेंत, आणि रामास हें गोंव्याजवळ आहे.

## द्वीपकल्पें.

कच्छ आणि काठेवाड हीं गुजराथेंत आहेत.

## बेटें.

मुंबई, द्वारका, साष्टी, उरण, तुर्भें, घारापुरी, आणि वेसावें हीं आहेत.

## बंदरें.

कराची, मांडवी, पोरबंदर, घोघो, सुरत, मुंबई, अलीबाग, उरण, बाणकोट, अंजनवेल, चिपळूण, राजापूर, रत्नागिरी, मालवण, वेंगुर्लें, गोंवें, कारवार, कुमठा, होनावर इत्यादि.

## क्षेत्रें.

द्वारका, सोरटीसोमनाथ, आबू, प्रभास, नासिक, त्रिंबक, सप्तशृंग, भीमाशंकर, आळंदी, देहू, गाणगापूर, महाबळेश्वर,

मराठी ग्रंथ संग्र...
ठाणे.



वा[illegible] माहुली, भीम, •यवतेश्वर, नरसोबाची वाडी, करवीर, [illegible], कनकेश्वर, हरेश्वर, परशुराम, धोपेश्वर, गणपति-पुळें, पंढरपूर, आणि गोकर्णमहाबळेश्वर, वगैरे आहेत.

## उत्पन्न.

**सिंधप्रांतांत**—कापूस, तंबाखू, लोंकर.

**कच्छप्रांतांत**—कापूस, सोरा, लोंकर, मीठ.

**गुजराथेंत**—कापूस, नीळ, ऊंस, कुसुंबा, मीठ, सुंठ, चंदन, अफू.

**कोंकणांत**—नारळ, मीठ, सुपारी, आलें, ऊंस.

**देशांत**—भूईमूग, तंबाखू, बटाटे, मिरची, ऊंस.

**दक्षिणमहाराष्ट्रांत**—कापूस, ऊंस, मिरची, तंबाखू, कुसुंबा.

**उत्तरकानडयांत**—नारळ, सुपारी, ऊंस, मिरीं, वेलदोडे.

ह्या शिवाय तांदूळ, ज्वारी, बाजरी, गहूं, हरभरे, अंबाडी, करडई, हीं धान्यें बहुतेक देशांत होतात.

## आगगाडीचे रस्ते-

**दि ग्रेत इंदियन पेनिनशुला रेल्वे**—हा रस्ता मुंबईंत बोरीबंदराहून निघून कल्याणास जातो, तेथें त्याचे दोन फांटे होतात. एक थळघाटांतून, नासिकावरून जबलपुराकडे जातो, आणि दुसरा फांटा बोरघाटांतून पुणें सोलापूर ह्यांवरून रायचुराकडे जातो.

**दि बांबेबडोदा ऑड सेंत्रल इंडिआ रेलवे**—हा रस्ता मुंबईंत कुलाब्याहून निघून सुरत, बडोदें, अहमदाबाद,ह्यांवरून वडवाणाकडे जातो.

**दि सिंध रेलवे**—हा सिंधमध्यें कराचीहून कोट्रीपर्यंत आहे.

**दि दौंड मनमाड स्तेत रेलवे**—हा दौंड जवळ दि ग्रेत इंडियन पेनिनशुला रेलवेच्या दुसऱ्या फांट्यापासून फुटून मनमाडाजवळ त्याच रेलवेच्या पहिल्या फांट्यास मिळतो.

**दि भावनगर गोंडल स्तेत रेलवे**—हा भावनगरापासून वढवाणपर्यंत गेला आहे.

---

# मुंबई इलाख्याचे मुख्य भाग.

१ सिंध, २ कच्छ, ३ गुजराथ, ४ महाराष्ट्र [ कोंकण आणि देश मिळून ] आणि दक्षिण महाराष्ट व उत्तरकानडा

## सिंधप्रांत.

ह्या प्रांतांत ५ जिल्हे आहेतः—१ अपर सिंध फांतियर २ शिकारपूर, ३ कराची, ४ हैदराबाद, ५ थर आणि पार्कर.

**अपरसिंध फ्रांतियर**—ह्यांत तालुके ३. मुख्य जाकोबाबाद.

शिकारपूर—ह्यांत तालुके १७. मुख्य शहरें, शिकारपूर, सक्कर, लारखाना, व रोरी.

कराची—ह्यांत तालुके १३. मुख्य शहरें कराची, ठट्टा, कोत्री.

हैदराबाद—ह्यांत तालुके ७. मुख्य शहरें हैदराबाद, मियानी.

थर आणि पारकर—ह्यांत तालुके ७. मुख्य शहरें थर-पारकर, उमरकोट.

ह्या प्रांतांत संस्थान—खैरपूर.

---

## कच्छ संस्थान.

### पर्वत.

उत्तरधार—पश्चिमेकडून पूर्वेकडे गेला आहे. उंच शिखर काळो

मध्यधार—कच्छचे उत्तरेस. उंच शिखर धिणोधर १,२६८ फूट उंच.

चाडवा—भूजचे दक्षिणेस. उंच शिखर ननामो १,४२४ फूट उंच.

### नद्या.

नागमती, रुक्मावती, खारी आणि लूनी.

### मुख्य शहरें,

भूज [ राजधानी ] मांडवी, केरा, भद्रेश्वर, कंथकोट, सुमरीरोह, अंजर, रापर, अधोई, वचाऊ, बेला, नलिया, कोथरा, आणि तेरा.

बंदरें,

मांडवी, मुंदरा, लखपट, जखौ, आणि तूणा.

गुजराथ, ( जिल्हे ५ )

पर्वत.

अबूचा पहाड, आणि राजपिंपळ्याचे डोंगर.

अहमदाबाद—तालुके ७. प्रांतीज, विरमगांव, धोलका, दस्क्रोई, धुंधुका, घोघो, सानंद.

शिवाय मोठे गांव—अहमदाबाद, धोलरा, मोरसा, मंडळ, पात्री.

खेडा—तालुके ७. कपडवंज, ठासरा, नडियाद, मेमदाबाद, मातर, आनंद, बोरसाद.

शिवाय मोठे गांव—खेडा, उमरेठ, महुधा, ओड, चकलासी, डाकोर

पंचमहाल—तालुके ३. गोद्रा. कलोल, दोहद.

भडोच—तालुके ५. भडोच, अंकलेश्वर, वाग्रा, आमोद, जंबुसर.

शिवाय मोठे गांव—टंकारिया ( बंदर )

सुरत—तालुके ८ पार्डी, बलसाड, चिखली, जलालपूर, बार्डोली, मांडवी, चौऱ्यायशी, ओलपाड

शिवाय मोठे गांव—सुरत, रांदेर.

काठेवाड—पर्वत गिरनार. नद्या—भादर, शेत्रंजी

शिकारपूर—ह्यांत तालुके १७. मुख्य शहरें, शिकारपूर, सक्कर, लारखाना, व रोरी.

कराची—ह्यांत तालुके १३. मुख्य शहरें कराची, ठट्टा, कोत्री.

हैदराबाद—ह्यांत तालुके ७. मुख्य शहरें हैदराबाद, मियानी.

थर आणि पारकर—ह्यांत तालुके ७. मुख्य शहरें थर-पारकर, उमरकोट.

ह्या प्रांतांत संस्थान—खैरपूर.

---

## कच्छ संस्थान.

### पर्वत.

उत्तरधार—पश्चिमेकडून पूर्वेकडे गेला आहे. उंच शिखर काळो

मध्यधार—कच्छचे उत्तरेस. उंच शिखर धिणोधर १,२६८ फूट उंच.

चाडवा—भूजचे दक्षिणेस. उंच शिखर ननामो १,४२४ फूट उंच.

### नद्या.

नागमती, रुक्मावती, खारी आणि लूनी.

### मुख्य शहरें,

भूज [ राजधानी ] मांडवी, केरा, भद्रेश्वर, कंथकोट, सुमरीरोह, अंजर, रापर, अधोई, बचाऊ, बेला, नलिया, कोथरा, आणि तेरा.

बंदरें,

मांडवी, मुंदरा, लखपट, जखौ, आणि तूणा.

गुजराथ, ( जिल्हे ५ )

पर्वत.

अबूचा पहाड, आणि राजपिंपळ्याचे डोंगर.

अहमदाबाद—तालुके ७. प्रांतीज, विरमगांव, धोलका, दस्क्रोई, धुंधुका, घोघो, सानंद.

शिवाय मोठे गांव—अहमदाबाद,धोलरा, मोरसा, मंडळ, पात्री.

खेडा—तालुके ७. कपडवंज, ठासरा, नडियाद, मेमदाबाद, मातर, आनंद, बोरसाद.

शिवाय मोठे गांव—खेडा, उमरेठ, महुधा, ओड, चकलासी, डाकोर

पंचमहाल—तालुके ३. गोद्रा. कलोल, दोहद.

भडोच—तालुके ५. भडोच, अंकलेश्वर, वाग्रा, आमोद, जंबुसर.

शिवाय मोठे गांव—टंकारिया ( बंदर )

सुरत—तालुके ८ पार्डी, बलसाड, चिखली, जलालपूर, बार्डोली, मांडवी, चौऱ्यायशी, ओलपाड.

शिवाय मोठे गांव—सुरत, रांदेर.

काठेवाड—पर्वत गिरनार. नद्या—भादर, शेत्रंजी, व मछू,

मोठीं संस्थानें–ध्रांगध्रा, वाकानेर, वडवाण लिमडी, साएला, जुनागड, बांटवा, जाफराबाद, पोरबंदर, भावनगर, पालिठाणा, लाथी, वाला, नवानगर, धरोल, राजकोट, गोंडल, मोरवी.

पालनपूर एजन्सी–संस्थानें ११–मोठीं संस्थानें–पालनपूर राधनपूर, थराद, मोरवाडा, कांकज, वाव, डिसा, ( मोठे शहर )

महिकांठा एजन्सी–मोठीं संस्थानें–ईदर, दांटा, माल्पूर, मोहनपूर, मानसा, घोडासर, अमलिआरा. शिवाय मोठे गांव--सादरा, वडाळी, वायड, गाबट.

रेवाकांठा एजन्सी–मोठीं संस्थानें–राजपिंपळा ( मुख्य श० नांदोद ) छोटाउदेपूर, देवगडबारिया, लुनावाडा, सोंथ, बालासिनोर.

खंबायतचें संस्थान–खंबायत.

पंचमहाल एजन्सी–नारूकोट.

सुरत एजन्सी–सचीन, वासदा, धरमपूर.

गायकवाडाचे राज्य–मोठे गांव–बडोदें ( राजधानी ) सुरत जिल्ह्यांत ) नवसरी, बलारी; बालेश्वर,

तेलारी, गणदेवी. ( काठेवाडांत ) अमरेली, ओखामंडळ, धारी, द्वारका, कच्छीगड, आरंभडू, पोशीतरू, धिणाकी, मडी, ( अहमदाबाद व महिकांठा ह्यांजवळ ) पट्टणसिद्धपूर, मैसाना, कडी. ( खानदेशांत ) वाज़पूर.

महाराष्ट्र देशाचे दोन भाग आहेत, कोंकण आणि देश. कोंकण ( भाग पहिला—जिल्हे ३. )

ठाणें जिल्हा—तालुके ११ डहाणू, माहीम; वसई, साष्टी, वाडें, भिवंडी, कल्याण, पनवेल, शहापूर, मुरबाड, कर्जत.

शिवाय मोठे गांव—ठाणें, वांद्रें, आगाशी, उरण.

संस्थान—जव्हार.

कुलाबा जिल्हा—तालुके ५—अलिबाग, पेण, रोहें, माण-गांव, महाड.

शिवाय मोठा गांव—रेवदंडा.

संस्थान—जंजिरा.

रत्नागिरी जिल्हा—तालुके ८—दापोली, खेड, चिपळूण, संगमेश्वर, रत्नागिरी, राजापूर, देवग― मालवण.

मोठी संस्थानें–ध्रांगध्रा, वाकानेर, वडवाण लिमडी, सायला, जुनागड, बांटवा, जाफराबाद, पोरबंदर, भावनगर, पालिठाणा, लाथी, वाला, नवानगर, धरोल, राजकोट, गोंडल, मोरवी.

पालनपूर एजन्सी–संस्थानें ११–मोठीं संस्थानें–पालनपूर राधनपूर, थराद, मोरवाडा, कांकज, वाव, डिसा, ( मोठे शहर )

महिकांठा एजन्सी–मोठीं संस्थानें–ईदर, दांटा, माल्पूर, मोहनपूर, मानसा, घोडासर, अमलिआरा. शिवाय मोठे गांव--सादरा, वडाळी, वायड, गावट.

रेवाकांठा एजन्सी–मोठीं संस्थानें–राजपिंपळा ( मुख्य श० नांदोद ) छोटाउदेपूर, देवगडबारिया, लुनावाडा, सोंथ, बालासिनोर.

खंबायतचें संस्थान–खंबायत.

पंचमहाल एजन्सी–नारूकोट.

सुरत एजन्सी–सचीन, वासदा, धरमपूर.

गायकवाडाचे राज्य–मोठे गांव–बडोदें ( राजधानी ) सुरत जिल्ह्यांत ) नवसरी, बल्लारी; वालेश्वर,

तेलारी, गणदेवी. ( काठेवाडांत ) अमरेली, ओखामंडळ, धारी, द्वारका, कच्छीगड, आरंभडू, पोशितरू, धिणाकी, मडी, ( अहमदाबाद व महिकांठा ह्यांजवळ ) पट्टणसिद्धपूर, मेसाना, कडी. ( खानदेशांत ) वाजपूर.

महाराष्ट्र देशाचे दोन भाग आहेत, कोंकण आणि देश. कोंकण ( भाग पहिला—जिल्हे ३. )

ठाणें जिल्हा—तालुके ११ डहाणू, माहीम; वसई, साष्टी, वाडें, भिवंडी, कल्याण, पनवेल, शहापूर, मुरबाड, कर्जत.

शिवाय मोठे गांव—ठाणें, वांद्रें, आगाशी, उरण.

संस्थान—जव्हार.

कुलाबा जिल्हा—तालुके ५—अलिबाग, पेण, रोहें, माण-गांव, महाड.

शिवाय मोठा गांव—रेवदंडा.

संस्थान—जंजिरा.

रत्नागिरी जिल्हा—तालुके ८ —दापोली, खेड, चिपळूण, संगमेश्वर, रत्नागिरी, राजापूर, देवगड, मालवण.

शिवाय मोठे गांव—वेंगुर्लें, हर्णई, मसुरें, बाणकोट, मुरूड, दाभोळ अंजनवेल, गुहागर.

संस्थान—सावंतवाडी.

---

देश ( भाग दुसरा—जिल्हे ६. )

खानदेश जिल्हा—तालुके १६ धुळें, अमळनेर, एरंडोल, पाचोरें, चाळीसगांव, पिंपळनेर, नंदुरबार, विरदेल, तळोदें, शहादें, शिरपूर, चोपडें, सांवदे, भुसावळ, नसराबाद, जामनेर.

शिवाय मोठे गांव-पारोळें, धरणगांव, यावल, फैजपूर, जळगांव, रावेर, भडगांव, नेर, शेंदूरणी, बोदवड, रुकडेल.

खानदेश एजन्सी—डांग देश, सुरगण, तालुका, मेवासी प्रांत.

नासिक जिल्हा—तालुके १०—बागलाण, चांदवड, दिंडोरी, इगतपुरी, नांदगांव, नासिक, निफाड, मालेगांव, सिन्नर, कोळवण.

शिवाय मोठे गांव——येवलें, विंचूर, त्रिंबकेश्वर.

**अहमदनगर जिल्हा**—तालुके ११— अकोलें, जामखेड, कर्जत, कोपरगांव, नगर, नेवासें, पारनेर, राहुरी, संगमनेर, शेवगांव, श्रीगोंदें.

**शिवाय मोठे गांव**—पाथर्डी, खर्डी, भिंगार, सोनाई, पुणतांबें, टोकें.

**पुणें जिल्हा**—तालुके ८—हवेली, पुरंदर, भिमथडी, इंदापूर जुन्नर, खेड, मावळ, शिरूर. पेटे—पौड, बारामती, घोडें.

**शिवाय मोठे गांव**—तळेगांव (ढमढेऱ्याचें.) सासवड, ओतूर, घोडनदी, तळेगांव, (दाभाड्याचें) नारायणगांव, मंचर.

**सातारा जिल्हा**—तालुके ११—जावळी, कऱ्हाड, कोरेगांव. खटाव, खानापूर, माण, पाटण, सातारा, तासगांव, वाई, वाळवें.

**शिवाय मोठे गांव**—मालकमपेठ, आष्टे, विटें, रहिमतपूर, म्हसवड, भिलवडी, नेर्लें, कोळें, इसलामपूर.

**सातारा जाहागिरी**—भोर, फलटण, औंध, जत.

**सोलापूर जिल्हा**—तालुके ७—करमाळें, बार्शी, माढें, सोलापूर, पंढरपूर, सांगोलें, माळशिरस.
**शिवाय मोठे गांव**—करकंब, वैराग मोहोळ, अकलूज.
**संस्थान**—अक्कलकोट.

---

**दक्षिणमहाराष्ट्र व उत्तर कानडा** ( जिल्हे ४. )

**कलादगी जिल्हा**—तालुके ८—बागलकोट, बदामी, हुनगुंद, मुद्देबिहाळ, सिंदगी, बागेवाडी, विजापूर, इंडी.
**शिवाय मोठे गांव**—कलादगी, गुलेदगड, इल्कल, गजेंद्रगड, तालीकोट, सुळेभावी, उकली, बदामी, मनगोळी.

**बेळगांव जिल्हा**—तालुके ७—बेळगांव, चिकोडी, गोकाक, अथणी, संपगांव, बिडी, परसगड.
**शिवाय मोठे गांव**—संवदत्ती, निपाणी, होंगल, संकेश्वर, मुरगोड, कित्तूर, सदलगी, मुनवळी, नंदगड, हुकेरी, यमकनमरडी, कोंगनोळी.
**संस्थान**—कोल्हापूर, ( दक्षिणमहाराष्ट्रांतील जहागिरी ) सांगली, जमखिंडी, मिरज,

कुरुंदवाड, मुधोळ, रामदुर्ग.

**धारवाड जिल्हा**—तालुके ११—धारवाड, नवलगुंद, रोण, गदग, हुबळी, कलघटकी, बंकापूर, करजगी, हानगल, राणेबिदनूर, कोड

शिवाय मोठें गांव—नरगुंद, बेटिगिरी हेबळी, आणिगिरी, मुलगुंद, हावेरी, नरेगल, शेलवडी, कुर्तकोटी, मुंडरगी.

**संस्थान**—सावनूर.

**उत्तरकानडा**—तालुके ७ कारवार, कुमठा, होनावर, सिद्धापूर, शिर्सी, येलापूर, सुपें.

**शिवाय मोठे गांव**—हल्याळ, अकोलें गोकर्ण, भाटकल, बनवासी.

---

मुंबई.

**हें** बेट पोर्तुगालदेशच्या राजानें इंग्लंदच्या राजास सन १६६१ त आंदण दिलें. हें ह्या इलाख्याची मुख्य राजधानी आहे.

येथेंच ह्या इलाख्याचा मुख्य गव्हरनर राहतो.

ह्या बेटाची लांबी ११ मैल व रुंदी ३ मैल आहे.

हें फार उत्तम बंदर आहे.

ह्या शहरांत ७॥ लक्ष मनुष्यें आहेत.

येथें पुष्कळ देशींचीं मनुष्यें व व्यापारी लोक आहेत.

येथें सरकारानें व लोकांनीं बांधलेल्या सुंदर इमारती बहुत आहेत.

सुताच्या व पिठाच्या पुष्कळ गिरण्या आहेत.

कुलाब्यास टोंकावर लाइट हाऊस ( दीपगृह ) पाहण्यासारखें आहे.

दुरून पाणी आणून ह्या शहरांत चहूंकडे नळांनीं खेळविलें आहे. आगगाड्या, तारायंत्रें, धुराचे दिवे, टांकसाळ, गोदी वगैरे पुष्कळ प्रकारचे अनेक कारखाने येथें पहाण्यासारखे आहेत.

सारांश ह्या शहरासारखें सुंदर शहर व बंदर सगळ्या हिंदुस्थानांत दुसरें नाहीं.

---

## राज्यरीति.

हा इलाखा गव्हरनर इन्कौन्सिल ह्याच्या ताब्यांत आहे. त्याच्या हाताखालीं चार कमिशनर आहेत:—पहिल्याच्या ताब्यांत सिंध प्रांत आहे; दुसऱ्याच्या ताब्यांत उत्तरभाग ह्मणजे अहमदाबाद, खेडा, पंचमहाल, भडोच, सुरत, ठाणें, व कुलाबा, हे जिल्हे आहेत; तिसऱ्याचे ताब्यांत मध्य भाग ह्मणजे नासिक, खानदेश, अहमदनगर, पुणें, सोलापूर, सातारा, हे जिल्हे आहेत. आणि चवथ्याचे ता-

ब्यांत दक्षिण भाग ह्मणजे रत्नांगिरी, कलादगी, बेळगांव, धारवाड, उत्तरकानडा, हे जिल्हे आहेत.

संस्थानांवरून पोलितिकल एजंट देखरेख करितात.

जिल्ह्याची व्यवस्था.—प्रत्येक जिल्ह्यांत एक कलेक्टर, दिस्त्रिक्त माजिस्त्रेट, असिस्टंट कलेक्टर, दिस्त्रिक्ट कलेक्टर हुजूर दिपोटी कलेक्टर, पोलिससुपरिंतेंदेंत, एक्झिक्युटिव इंजीनियर, पाहणी व मोजणी करणारे कामगार, जज्ज पोस्तमास्तर, आणि सिव्हिल सर्जन, असे कामगार असतात.

**कलेक्टर व दिस्त्रिक्त माजिस्त्रेट.**—महसूल वसूल करणें, सरकारी खर्चाची व्यवस्था, मुलकी व माजिस्त्रेती कामें वगैरे कामें करितो.

**असिस्टंट कलेक्टर व दिस्त्रिक्ट दिपोटी कलेक्टर.**— } एक किंवा अधिक तालुक्यांचीं कामें पाहतात.

**हुजुर दिपोटी कलेक्टर.**— जिल्ह्याचा खजिना वगैरे काम पाहतो.

**पोलिस सुपरिंतेंदेंत.**—चोर व दरवडेखोर ह्यांस पकडतो.

**इंजीनियर.**—रस्ते, तलाव, धर्मशाळा, वगैरे कामें करितो.

**पाहणी व मोजणीचे कामगार.**—जमिनीचा सारा ठरवितात.

**जज्ज**—दिवाणी व फौजदारी खटले तपासतो.

**पोस्त मास्तर**—टपालाचें काम पहातो.

सिव्हिलसर्जन.—औषधें देणें, व इस्पितालें ह्यांची कामे करितो.

मामलेदार—कलेक्टरासारखें काम पाहतो.

महालकरी.—असिस्तंत कलेक्टरचें काम पाहतो.

फौजदार.—पोलिस सुपरिंतेंदेंतचें काम पाहतो.

मुनसफ.—दिवाणी खटले तपासतो. मोठा तालुका असल्यास तेथें मुन्सफ असतो, नाहीं तर दोन तीन तालुक्यांस मिळुन एकच असतो. मोठ्या शहरीं ह्याच कामासाठीं स्मालकाज कोर्टही असतें.

॥ समाप्त. ॥

…ां लिहिलेलीं पुस्तकें विक्रीस तयार आहेत.

शब्दसंग्रह भाग १ .... .... .... किं. २॥ आं.

शब्दसंग्रह भाग २ कवितांचे

अन्वयार्थासह ... .... .... .... " ३ "

शब्दसंग्रह भाग ३ .... .... .... " ३ "

कवितार्थबोध अथवा मराठी चवथ्या

पुस्तकांतील कवितांचा अन्वयार्थ. " ५ "

मोडीवाचनतत्व .... .... ... .... " २ "

मोडी रीतिबोध .... .... .... .... " ३ "

हिंदुस्थानचा प्रश्नोत्तररूप संक्षिप्त

इतिहास .... .... .. .... " ५॥ "

मुंबई इलाख्याचा नकाशा ... .... " २ "

हावर्डकृत इंग्रजी सेकंडबुक

सेकंडपार्टाचा शब्दसंग्रह .... " ४ "

सदर्हू पुस्तकें मुगभाटामध्यें आमचे प्रायव्हेट स्कूलांत, 'नेटिव ओपिनियन' व 'इंदुप्रकाश' छापखान्यांत टपालखर्चासह किंमत पाठविली असतां ताबडतोब रवाना करण्यांत येतील.

गोविंद रामकृष्ण फणसळकर

मुंबई, मुगभाट प्रायव्हेट स्कूल.